# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.07.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या,**

गेल्या 10 वर्षांत देशातली हवाई वाहतूक सेवा जगात तिसऱ्या स्थानावर पोहोचल्याचं, नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचं प्रतिपादन

आषाढी वारीसाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सर्व सुविधा पुरवणार – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

झिम्बाव्वेविरुद्ध 20 षटकांची क्रिकेट मालिका भारतानं 4-1 नं जिंकली

आणि

राज्याच्या बहुतांश भागात पावसाची संततधार, कोकणात जनजीवन विस्कळीत

**पुणे विमानतळ**

गेल्या 10 वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशातल्या हवाई वाहतूक क्षेत्रानं मोठी प्रगती केली असून जागतिक पातळीवर हे क्षेत्र तिसऱ्या स्थानावर पोहोचल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल सांगितलं. पुण्याच्या लोहगाव विमानतळावर नव्यानं उभारण्यात आलेलं टर्मिनल मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवाशांच्या सेवेसाठी खुलं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. नव्या टर्मिनलवरून विमान प्रवास करणाऱ्या पहिल्या प्रवाशाला यावेळी मोहोळ यांच्या हस्ते बोर्डिंग पास देण्यात आला. आगामी काळात देशभरात आणखी 20 ते 25 नवीन विमानतळांची उभारणी केली जाणार असल्याचं सांगून **मोहोळ म्हणाले..**

**मुख्यमंत्री**

आषाढी वारीसाठी येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारची कमतरता भासू दिली जाणार नाही, वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पंढरपुरात दिली. आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा घेऊन सोई सुविधांची पाहणी केल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.  या वर्षी पंढरपुरात स्वच्छता व्यवस्था चांगली आहे, गेल्या वर्षीच्या तुलनेत सोई सुविधांमध्ये आणखी वाढ करण्यात आल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

यावेळी त्यांनी करकंब इथं श्री संत निळोबाराया पालखीचं दर्शन घेतलं आणि पालखीसमवेत काही वेळ पायी प्रवास केला.

**अजित पवार**

जनतेचा विकास आणि गरिबांना सहाय्य हेच आमचं उद्दिष्ट असून येत्या विधानसभा निवडणुकीत हाच विचार आम्ही राज्यातील जनतेसमोर मांडणार आहोत, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल सांगितलं. बारामतीमध्ये आयोजित 'जन सन्मान' रॅलीत ते बोलत होते. राज्यातल्या महिलांना सक्षम आणि आत्मनिर्भर करण्यासाठी सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली असून राज्यातल्या लाडक्या बहिणींच्या खात्यात रक्षाबंधनाच्या दिवशी तीन हजार रुपये जमा होतील असं पवार म्हणाले. राज्य सरकारनं शेतकऱ्यांना मोफत वीज, तसंच एक रुपयात पीक विमा देण्याचा निर्णय घेतल्याचंही त्यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.
बारामती पंचायत समितीमध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमालाही अजित पवार उपस्थित होते. राज्यातील एकही पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही पवार यांनी यावेळी दिली.

**कृषी संजीवनी सप्ताह**

राज्यात कडधान्य आणि तेलबियांच्या लागवड वाढीसाठी कृषी आयुक्तालयानं विशेष मोहिम राबवली. मान्सूनपूर्व पावसामुळे खरीप हंगामात गेल्या वर्षाच्या तुलनेत मूग, उडीद, तीळ आणि सुर्यफुलांच्या पेरणीत लक्षणीय वाढ झाली आहे. एक लाख 81 हजार हेक्टरवर मूग, दोन लाख 56 हजार हेक्टरवर उडीद, सात हजार हेक्टरवर सुर्यफूल, सहा हजार हेक्टरवर तिळाची पेरणी झाली आहे. यंदाच्या वर्षी कडधान्यं आणि तेलबियांचा पेरा वाढल्यामुळे त्यांच्या उत्पादनात वाढ होईल असा अंदाज कृषी आयुक्तालयानं व्यक्त केला आहे.

**समाजवादी पार्टी**

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी समाजवादी पार्टी महाराष्ट्रात इंडिया आघाडीबरोबर निवडणूक लढवणार असून 30 ते 35 जागा लढवण्याचा समाजवादी पार्टीचा विचार आहे, तसंच धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा विधानसभा मतदारसंघावर आम्ही दावा करणार आहोत अशी माहिती समाजवादी पार्टीचे राज्य कार्याध्यक्ष प्रतापराव होगाडे यांनी दिली. ते काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. येत्या नऊ ऑगस्ट रोजी समाजवादी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांची मालेगाव इथं जाहीर सभा होणार आहे; तसंच 19 जुलैला उत्तर प्रदेशातील समाजवादी पार्टीचे सर्व खासदार मुंबईत येत आहेत, असं त्यांनी सांगितलं. विजेच्या प्रश्नावर

समाजवादी पार्टी चळवळ उभी करत असून प्रीपेड मीटर हद्दपार करा ही आमची प्रमुख मागणी आहे, असं होगाडे यावेळी  म्हणाले.

**झिका रूग्ण**

राज्यात  झिका या विषाणूजन्य आजाराचे सर्वाधिक रूग्ण पुण्यात आढळले आहेत. राज्यातील एकंदर 21 रूग्णांपैकी 19 रूग्ण पुण्यात, एक कोल्हापूरमध्ये तर एक संगमनेरमध्ये आढळून आला आहे. राज्यभरात आतापर्यंत 211 गर्भवतींचे रक्तनमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले असून त्यातल्या १० महिलांना झिकाची लागण झाल्याचं आरोग्य विभागानं म्हटलं आहे.

**दूध आंदोलंन**

दुधाला प्रति लिटर 40 रुपये भाव मिळावा आणि दुधाला  एफ.आर.पी. देण्याच्या  प्रमुख मागणीसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीनं  अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यामध्ये कोतुळ इथं  आंदोलन सुरू आहे; या आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात आजपासून येत्या 21 जुलै पर्यंतच्या कालावधीमध्ये राज्यभर तीव्र आंदोलनं करण्यात येणार आहेत. शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक अजित नवले यांनी काल ही माहिती दिली.

**क्रिकेट**

झिम्बाब्वेविरुद्ध पाचव्या आणि अखेरच्या टी-ट्वेंटी सामन्यात 42 धावांनी विजय मिळवत भारतानं पाच सामन्यांची ही मालिका 4-1 नं जिंकली आहे. कालच्या सामन्यात झिम्बाब्वेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. भारतानं निर्धारीत २० षटकांत १६७ धावा केल्या. संजू सॅमसन यानं अर्धशतकी खेळी केली. विजयासाठी 168 धावांचं लक्ष्य गाठताना, झिम्बाव्वेचा संघ 125 धावांच करू शकला. भारताच्या मुकेश कुमारनं 4 गडी बाद केले.

**पाऊस**

राज्याच्या बहुतांश भागात कालही पावसाची संततधार सुरू होती. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, आणि पालघर जिल्ह्यात मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे.  कोकण रेल्वेमार्गावर दिवाणखवटी आणि विन्हेरे या स्थानकांदरम्यान काल दरड कोसळल्यामुळे कोकण रेल्वेच्या अनेक गाड्यांच्या वेळा बदलण्यात आल्या असून, अनेक गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. मुंबईकडे जाणाऱ्या तेजस एक्सप्रेस, जनशताब्दी एक्स्प्रेस या गाड्या रत्नागिरी स्थानकात सायंकाळी पावणेसहापासून थांबवण्यात आल्या आहेत.  रत्नागिरी जिल्ह्यातल्या सर्व शाळा-महाविद्यालयांना आज सुटी जाहीर करण्यात आली आहे.

चिपळूणमध्ये एनडीआरएफची एक तुकडी सज्ज असून, खेडमध्ये येण्यासाठी एनडीआरएफची एक तुकडी काल संध्याकाळी पुण्यातून रवाना झाली.जगबुडी नदीला पूर आल्यामुळं खेडमधल्या अनेकांना स्थलांतरित करण्यात आलं आहे. चिपळूणची वाशिष्ठी नदी, राजापुरातली कोदवली आणि लांज्यातली मुचकुंदी या नद्या इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत. मंडणगड तालुक्यातल्या भारजा नदीला पूर आला असून, चिंचघर-मांदिवली पुलावरून पाणी जात असल्यानं वाहतूक बंद करण्यात आली आहे, अतिवृष्टीचा सर्वाधिक तडाखा खेड तालुक्याला बसला असून सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातही नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून काही ठिकाणची वाहतूक बंद पडली आहे.रायगड जिल्ह्यात आज महाड, माणगाव, पोलादपूर तालुक्यातील शाळांना जिल्हाधिकारी यांनी सुटी जाहीर केली आहे.नाशिक शहरासह जिल्ह्यात पावसाचा जोर कालही कायम होता. अंजनेरी इथं सहलीला गेलेली मुलं  जोरदार पावसामुळं अडकली होती. वनखात्यानं त्यांची सुखरूप सुटका केली. पुणे शहर आणि जिल्ह्यात काल दमदार पाऊस झाला.  या पावसानं खडकवासला धरण साखळीतील पाणी साठयात वाढ झाली आहे.

**हवामान**

कोकणात अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश, मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे आणि विजांसह जोरदार ते अति जोरदार पाऊस पडेल.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**